पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विदेशी भाषा विभाग व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'सामाजिक परिवर्तनशीलता आणि शिक्षण' या विषयावर सुप्रसिद्ध 'भुरा' आत्मकथनाचे लेखक डॉ. शरद बाविस्कर (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी, दिल्ली) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि. २५) सकाळी ११ वाजता वि. स. खांडेकर सभागृह, भाषा भवन येथे व्याख्यान होईल. यावेळी अधिविभाग, महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज कॅमेरा हँडलिंग कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने गुरुवार दि. २४ नोव्हेंबर रोजी कॅमेरा हँडलिंग या विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. अध्यासनाच्या नवीन इमारतीमध्ये दुपारी अडीच ते साडेपाच या वेळेत ही कार्यशाळा होईल. यात माध्यमातील कॅमेरामन प्रशांत आयरेकर व रवींद्र बागल विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

सकाळ

# शिवराज महाविद्यालय अजिंक्य

## फेन्सिंग स्पर्धा

कोल्हापूर, ता. २३ : डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, साळोखेनगर आणि कोल्हापूर जिल्हा तलवारबाजी असोसिएशनतर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तलवारबाजी स्पर्धेत गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाने सर्वसाधारण अजिंक्यपद पटकावले.

स्पर्धेत मुलांच्या गटात 'शिवराज'च्या विपुल येडेकर याने फॉईल प्रकारात व आदित्य आंगल याने सेबर प्रकारात, तर सांगलीतील आरवाडे कॉलेजच्या गिरीश जकाते याने ईपी प्रकारात सुवर्णपदक पटकावले. डॉ. अभिजित माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने, फेन्सिंग असोसिएशनचे सचिव विनय जाधव यांच्या हस्ते विजेत्यांना गौरविले.

### स्पर्धेचा निकाल

**• फॉईल मुले प्रकार**

विपुल येडेकर - शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज - सुवर्ण

गिरीश जकाते - आरवाडे कॉलेज, सांगली - रौप्य

अथर्व कांबळे - शिवराज कॉलेज, गडहिंग्लज - कांस्य

प्रथमकुमार शिंदे - शिवराज कॉलेज, गडहिंग्लज - कांस्य

**• सेबर मुले**

आदित्य आंगल - शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज - सुवर्ण

धनंजय जाधव - शिवराज कॉलेज महाविद्यालय, गडहिंग्लज - रौप्य

साहिल गुजर - वाय. सी. कॉलेज, सातारा - कांस्य

ओम जौनजल - आर. आय. टी. साखराळे - कांस्य

**• ईपी मुले**

गिरीश जकाते - आरवाडे कॉलेज, सांगली - सुवर्ण

श्रेयश तांबवेकर - के. डब्ल्यू. कॉलेज, सांगली - रौप्य

श्रीधर पवार - के. जी. डी. बापू लाड, कॉलेज, कुंडल - कांस्य

प्रणव रावळ - दत्ताजीराव कदम, इचलकरंजी - कांस्य

तरूण भारत

# विद्यापीठात मतदार नोंदणी मदत कक्ष

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या जवळ दक्षिणबाजूस जिल्हा निवडणूक शाखांच्या वतीने मतदार नोंदणी मदत कक्ष सुरू करण्यात आला. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवकांनी २६ नोव्हेंबरपर्यंत मतदार नोंदणी कक्षास भेट देवून नवीन मतदार नोंदणी करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने केले आहे.

नोंदणी कक्षाद्वारे नवतरूण मतदार यांची मतदार नोंदणी, मतदार यादीतील तपशील दुरूस्त करण्याकरिता नमुना क्रमांक ६ व नमुना क्रमांक ८ चे अर्ज भरून घेणे व चौकशीद्वारे मतदार यादीच्या नोंदणी प्रक्रीयेची माहिती देणे इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मतदार नोंदणी प्रक्रीया ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने होणार आहे. व्होटर हेल्पलाईन ॲपद्वारे माहितीचे संकलन करणे व भरण्याची काम सुरू आहे. विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारणे व शंकांचे निरसन करण्याचे काम जिल्हा निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी करीत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 NOV 2022
तरुण भारत

# तलवारबाजीत 'विवेकानंद'च्या विद्यार्थिनींचा ठसा

प्रतिनिधी
कळंबा

डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग साळोखेनगर व कोल्हापूर जिल्हा तलवारबाजी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तलवारबाजी स्पर्धेला डी.वाय. पाटील नॉलेज कॅम्पस साळोखेनगर येथे मोठ्या उत्साहात सुरवात झाली. पहिल्या दिवशी विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूरच्या मुलींनी स्पर्धेवर ठसा उमटवला. विवेकानंदच्या ज्योती सुतारने फॉईल प्रकारात व अनन्या जोशी हिने ईपीमध्ये तर आजरा महाविद्यालयाच्या ज्योती सुतार हिने सेबर प्रकरात सुवर्णपदक प्राप्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, डी. वाय. पाटील नॉलेज कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. अभिजीत माने आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशनचे सचिव विनय जाधव यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील १३२ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे. कॅम्पस संचालक डॉ.अभिजीत माने यांनी संस्थेचे उपाध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री व ऑल इंडिया फेन्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष सतेज पाटील यांच्या खास आग्रहास्तव हा उपक्रम आयोजित करत असल्याचे सांगितले.

**स्पर्धेचा खेळ प्रकार निहाय निकाल असा : फाईल प्रकार** – ज्योती सुतार (विवेकानंद कॉलेज)–सुवर्ण, तनवी कुऱ्हाडे (जयंतराव आरवाडे कॉलेज, सांगली)–रौप्य, अनन्या जोशी (विवेकानंद कॉलेज) व अनुजा ढबाले (शिवराज कॉलेज गडहिंग्लज) कांस्य. **सेबर प्रकार** – ज्योती सुतार (आजरा महाविद्यालय)–सुवर्ण, श्लोका शिंदे (विवेकानंद कॉलेज)–रौप्य, स्नेहल पाटील (विवेकानंद कॉलेज) व अमृता तराळ (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज) कांस्य. **ईपी प्रकार** – अनन्या जोशी (विवेकानंद कॉलेज)–सुवर्ण, श्लोका शिंदे (विवेकानंद कॉलेज)–रौप्य, श्रेया शिंदे (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), सानिका कदम (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज) कांस्य.

यावेळी एस. के. पाटील कॉलेज कुरुंदवाडचे प्राचार्य डॉ. सुनील चव्हाण, डी. वाय. पाटील अभियांत्रिकीचे फीजिकल डायरेक्टर डॉ. राजेंद्र रायकर, विद्यानिकेतन स्कूलच्या प्राचार्या श्रीमती शांती कृष्णमूर्ती, झोनल स्पोर्टस सचिव भाऊसाहेब वडर तसेच विद्यापीठ संघ निवड समितीचे प्रा. किरण पाटील, प्रा. महेश पाटील, प्रा. राहुल मगदूम उपस्थित होते. स्पर्धा आयोजनासाठी संस्थेचे फीजिकल डायरेक्टर सचिन पाटील, संतीश कोळी यांनी प्रयत्न केले, सूत्रसंचालन प्रा. प्रवीण देसाई यांनी व सतीश कोळी यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मुलींच्या तलवारबाजी स्पर्धेचे विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या हस्ते उद्घाटन केले. यावेळी डॉ. अभिजीत माने, विनय जाधव, प्राचार्य डॉ. सुनील चव्हाण, डॉ. राजेंद्र रायकर, प्राचार्य कृष्णमूर्ती व प्रा. किरण पाटील आदी.